




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■








●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २७३ ●शुक्रवार,दि.०२ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955


# जनतेच्या पैशातून होणारी विकासकामे, दर्जेदार, गुणवत्तापूर्ण करा : उपमुख्यमंत्री अजित पवार

## नूतन वर्षाच्या पहिल्या दिवशी 1363 विकास कामांचे उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य आहे. यासाठी सर्वांची सोबत आवश्यक आहे. भारतीय संविधान, कायद्याचा आदर करत बीडकरांनी दैनंदिन जीवनात बीडच्या विकासासाठी शिस्त पाळावी, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीडवासीयांना केले.



जनतेच्या पैशातून होत असलेली विविध विकासकामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण होतील, यावर बारकाईने लक्ष द्यावे, अशा सूचनाही जिल्हा प्रशासनाला उपमुख्यमंत्र्यांनी केल्या. शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर जिल्ह्यातील १३६३ विकासकामांचे भूमिपूजन व पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. जिल्हा परिषद बीड अंतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतील विविध विकासकामांचे भूमिपूजन, टेनिस कोर्टाचे उद्घाटन श्री. पवार यांच्या हस्ते झाले. यासह प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत 'दिवाळी नवीन घरात' उपक्रमाचा समारोप, इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप, ध्वज निधी संकलनात बीड जिल्हा राज्यात प्रथम आल्याने सत्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान सोहळाही या एकाच ठिकाणी उपमुख्यमंत्री पवार यांच्या उपस्थितीत पार पडला.

या कार्यक्रमास सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार बजरंग सोनवणे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, प्रकाश सोळंके, सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, बीडच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रेमलता पारवे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत उपस्थित होते.

श्री.पवार म्हणाले, नवीन इंग्रजी वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा. येत्या नववर्षात आपणास बीडच्या विकासात अधिक भर घालायची आहे. या वर्षाच्या सुरूवातीलाच १३६३ विकासकामांनी सुरूवात झाली आहे, ▶उर्वरित पान २ वर

### ● टॅब वितरण

महाज्योती संस्थेमार्फत ओबीसी प्रवर्गातील २९३ विद्यार्थ्यांना टॅब उपलब्ध करून देण्यात आले असून, त्यातील ५ विद्यार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात टॅब वाटप करण्यात आले.

### ● टेनिस कोर्टाचे लोकार्पण

जिल्हा क्रीडा संकुल येथे ८० लक्ष रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या सुसज्ज सिन्थेटीक लॉन टेनिस कोर्टाचे लोकार्पण यावेळी करण्यात आले.

### ● महत्त्वाच्या पायाभूत सुविधांची घोषणा

कार्यक्रमात वडवणी येथील स्व. महीपतराव गणपतराव कोठूळे शासकीय आयटीआयच्या इमारतीसाठी ८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देऊन त्याचे भूमीपूजन करण्यात आले.

### ● जिल्हाधिकारी, जिल्हा सैनिक अधिकारी यांचा सन्मान

ध्वजनिधी संकलनात बीड जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा विशेष सत्कार या सोहळ्यात करण्यात आला.

# अंबाजोगाईकरांसाठी नवीन वर्षाची मोठी भेट, 'स्वाराती'मधील अत्याधुनिक नवीन सीटी स्कॅन मशिन आठवडाभरात सुरु होणार

## आ. नमिता मुंदडांचा पाठपुरावा यशस्वी ; गोरगरीब रुग्णांची परवड थांबणार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सीटी स्कॅन मशिनचे इन्स्टॉलेशन अखेर पूर्ण झाले असून नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी, गुरुवारी १ जानेवारी रोजी या मशिनची यशस्वी चाचणी घेण्यात आली. आमदार नमिता मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून राज्य शासनाने मंजूर केलेल्या १५



कोटी रुपयांच्या निधीतून ही अत्याधुनिक मशिन बसवण्यात आली आहे. येत्या पाच ते सहा

● नवीन मशीन कार्यान्वित होईपर्यंत अक्षरशः यवतमाळ व अकोला येथील जुन्या मशिनचे पार्ट आणून जुन्या मशीनला लावून तात्पुरती सोय करावी लागली होती. मात्र आता नवीन अत्याधुनिक मशीन सुरु झाल्याने अचून निदान होण्यास मदत होईल. गोरगरीब रुग्णांची परवड थांबणार असल्याचे समाधान आहे. –आ. नमिता मुंदडा

मोठा दिलासा मिळणार आहे.

स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे मराठवाड्यातील एक अत्यंत जुने आणि महत्त्वाचे वैद्यकीय केंद्र असून येथे दररोज रुग्ण किंवा गंभीर आजारांच्या निदानासाठी ही सेवा जीवनदायी ठरते. मात्र, गेल्या काही काळापासून येथील जुनी मशिन वारंवार ▶ उर्वरित पान २ वर

# रणवीर पंडित यांनी दिलेल्या संधीचे खेळाडूंनी सोने केले : श्रीहरी पवार

## क्रिडा महोत्सवात मुलांच्या खो- खो स्पर्धेचे शानदार उद्घाटन

**गेवराई । प्रतिनिधी**

शिक्षण क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये शिवछत्र परिवाराने मोठी चळवळ उभी केली, तो वसा आणि वारसा सक्षमपणे रणवीर पंडित पुढे घेऊन जात असताना त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दिलेल्या संधीचे ग्रामीण खेळाडूंनी सोने केले आहे असे गौरवोद्गार बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी पवार यांनी काढले. जयभवानी आणि



जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवाच्या सहाव्या दिवशी मुलांच्या गटात खो-खो स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते. शारदा ▶ उर्वरित पान २ वर

### ● खो-खो रिमिक्स गाण्यावर विद्यार्थ्यांचा नृत्य आविष्कार

यावेळी माध्यमिक विद्यालय पाचेगावच्यि विद्यार्थ्यांनी खो-खो रिमिक्स गाण्याषस विविध गितावर नेत्रदीपक नृत्य करुन उपस्थितांचे लक्ष वेधले... येगं ये ये बाई...गाऊ आकाशात अ..आ.ई.... ये ये अंगनाशी.....वारा बांद पदराशी ! अशा वेगवेगळ्या गाण्यात नृत्य करुन विद्यार्थ्यांनी उपस्थितांची वाहवा मिळवली.

# यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नुतणीकरणासाठी 8.19 कोटी रुपये मंजुर

## नववर्षानिमित्त बीडकरांना अजितदादांकडून सुखद भेट : आ. विजयसिंह पंडित



● आ. विजयसिंह पंडित यांनी माहिती देताना सांगितले की, बीड जिल्ह्यातील सुमारे १३६३ विकास कामांचा शुभारंभ करण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार बीड शहरात आले, नगर परिषद निवडणुकीनंतर पहिल्यांदाच ते बीड शहरात येत होते. बीड शहरातील नागरीकांसाठी महत्वाच्या विषयांच्या अनुषंगाने त्यांनी यावेळी चर्चा केली.

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची अतिशय दुरावस्था झाल्यामुळे रसिक प्रेक्षकांसह रंगकर्मींनी या बाबत तिव्र नाराजी व्यक्त केली होती. नगर परिषद निवडणुकीच्या जाहिरनाम्यात या कामाचे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने देण्यात आले होते. निवडणुकीनंतर राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अजितदादा पवार पहिल्यांदाच बीड शहरात आले, त्यांनी नववर्षाच्या प्रथमदिनी शासन निर्णय निर्गमित करून यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नुतणीकरणासाठी ८.१९ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला आहे. नववर्षानिमित्त बीडकरांना अजितदादांकडून सुखद भेट या माध्यमातून देण्यात आली असल्याचे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले असून आ. पंडित यांनी बीडकर नागरीकांच्यावतीने ना. अजितदादा ▶उर्वरितपान२वर

# कल्याण-लातूर द्रुतगती महामार्गाच्या मुद्द्यावर अनिलदादा जगताप यांची थेट मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांकडे धाव!

## कल्याण-लातूर द्रुतगती महामार्ग बीड जिल्ह्यातूनच हवा: अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

प्रस्तावित मुंबई-हैदराबाद (कल्याण-लातूर) जनकल्याण द्रुतगती महामार्ग हा मूळ आराखड्यानुसारच बीड जिल्ह्यातून व बीड शहराच्या जवळून राबवावा, अशी ठाम मागणी शिवसेनेचे बीड जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार



यांना सविस्तर निवेदन दिले आहे.

नुकत्याच नागपूर येथे पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुंबई-हैदराबाद (कल्याण-लातूर) या महत्त्वाकांक्षी द्रुतगती महामार्गाची घोषणा करण्यात आली. या प्रकल्पाच्या मूळ संकल्पनेनुसार लातूर-अंबाजोगाई- धारूर/केज-बीड-पाटोदा/जामखेड-आष्टी/कडा- अहिल्यानगर मार्गे कल्याण/ बदलापूर असा मार्ग प्रस्तावित असून, तो बीड जिल्ह्यातून जाणे अपेक्षित असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. हा महामार्ग केवळ दळणवळणाचा मार्ग नसून बीड ▶ उर्वरित पान २ वर

# चुकांबद्दल माफी मागते, सर्व अर्ज मागं घेतले, वाघीण जखमी झाल्यावर ती अजून जोरात काम करते,

## पूजा जाधव यांना रडू कोसळलं



**पुणे । प्रतिनिधी**

पूजा जाधव हिनं पुणे महानगरपालिका वॉर्ड क्रमांक २ मधून माघार घेतली आहे. भाजपकडून प्रभाग क्रमांक २ मधून उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियावरुन जोरदार टीका करण्यात आली होती. त्यामुळं पूजा जाधव हिनं अर्ज मागं घेतला. त्यानंतर पुण्यात पत्रकार परिषद घेत तिनं भूमिका स्पष्ट केली. विरोधकांनी षडयंत्र केलं, त्याची बळी ठरले, असंही पूजा जाधवनं म्हटलं. मी स्वतः हिंदू आहे, हिंदुत्वासाठी काम करेल. आतापर्यंत झालेल्या चुकांबद्दल माफी मागते, जिथे भाजपला गरज आहे तिथं काम करणार आहे. वाघीण जखमी झाल्यावर ती अजून जोरात काम करते, असं पूजा जाधव हिने म्हटलं.

पूजा जाधव पत्रकार परिषदेत रडल्या- आजचा हा दिवस माझ्यासाठी खूप अवघड दिवस आहे. ▶ उर्वरित पान २ वर






# ग्रामीण भागातील शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणारे कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी लाभदायक : बाबुराव बोत्रे पाटील

## गेवराई येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे विविध मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना आधुनिक व नाविन्यपूर्ण कृषी तंत्रज्ञानाची माहिती मिळावी, त्यांच्या शेतीत उत्पादन वाढावे आणि आर्थिक उन्नती साधता यावी या उद्देशाने महेश बेदरे यांनी सुरू केलेले कृषी प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी अत्यंत



लाभदायक ठरणार आहे, असे प्रतिपादन ओंकार उद्योग समूहाचे चेअरमन तथा साखरसाम्राट बाबुराव बोत्रे पाटील यांनी केले. ते गेवराई येथे आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री ▶ उर्वरित पान २ वर




# अंतर्मुख व्यक्तिमत्त्व आणि समाजाची समृद्धी

समाजामध्ये अनेकदा आवाज करणाऱ्यांनाच ऐकले जाते, बोलणाऱ्यांनाच नेतृत्व मिळते आणि स्वतःला सतत मांडणाऱ्यांनाच यशस्वी समजले जाते. अशा गोंगाटी सामाजिक वास्तवात शांत राहणारी, कमी बोलणारी, स्वतःच्या विचारविश्वात रमणारी अंतर्मुख व्यक्ती बहुतांश वेळा दुर्लक्षित राहते. म्हणूनच दरवर्षी ०२ जानेवारी हा दिवस 'जागतिक अंतर्मुखी दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ एका व्यक्तिमत्त्व प्रकाराचा उत्सव नसून, समाजाने दीर्घकाळ दुर्लक्ष केलेल्या एका महत्त्वपूर्ण मानवी प्रवृत्तीची दखल घेण्याचा, तिचा सन्मान करण्याचा आणि तिच्या सामाजिक योगदानाचे मूल्यमापन करण्याचा दिवस आहे.

समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले असता, अंतर्मुखता ही केवळ वैयक्तिक स्वभावाची बाब नसून ती सामाजिक रचना, सांस्कृतिक मूल्ये, शिक्षणव्यवस्था आणि सत्तासंबंध यांच्याशी खोलवर निगडित आहे. कोणताही समाज विशिष्ट प्रकारच्या व्यक्तिमत्त्वाला अधिक महत्त्व देतो आणि त्यानुसार सामाजिक निकष निर्माण करतो. आधुनिक औद्योगिक व उत्तर-औद्योगिक समाजात बहिर्मुख व्यक्तिमत्त्वाला यश, नेतृत्व आणि आत्मविश्वासाचे प्रतीक मानले जाते. परिणामी अंतर्मुख व्यक्तिमत्त्वाला दुय्यम स्थान दिले जाते. ही असमतोल दृष्टी समाजाच्या समृद्धीसाठी घातक ठरू शकते.

अंतर्मुख व्यक्ती या स्वभावतः विचारशील, निरीक्षणशील, संवेदनशील आणि आत्मपरीक्षण करणाऱ्या असतात. त्या बोलण्याऐवजी ऐकणे




पसंत करतात, गोंगाटापेक्षा शांतता निवडतात आणि बाह्य जगापेक्षा अंतर्गत जगाशी अधिक संवाद साधतात. समाज मात्र या गुणांना कमजोरी समजतो. 'कमी बोलणे म्हणजे आत्मविश्वासाचा अभाव', 'एकटेपणा म्हणजे असामाजिकता' आणि 'शांतपणा म्हणजे अकार्यक्षमता' अशा गैरसमजांमुळे अंतर्मुख व्यक्तींना सतत स्वतःचे अस्तित्व सिद्ध करावे लागते. समाजशास्त्र सांगते की हे गैरसमज सामाजिक पूर्वग्रहांचे परिणाम आहेत, वास्तवाचे नाहीत.

भारतीय सामाजिक-सांस्कृतिक परंपरेत अंतर्मुखतेला पूर्वी मोठे महत्त्व होते. ध्यान, योग, तपश्चर्या, मौन आणि चिंतन या संकल्पना भारतीय तत्त्वज्ञानाचा आत्मा होत्या. संत, महात्मे, विचारवंत आणि तत्त्वज्ञ हे बहुतेक वेळा अंतर्मुख प्रवृत्तीचे होते. त्यांनी समाजाला दिशा दिली ती गोंगाटातून नव्हे, तर शांत चिंतनातून. मात्र आधुनिक काळात पाश्चात्त्य प्रभावाखालील शिक्षणपद्धती आणि स्पर्धात्मक जीवनशैलीमुळे बहिर्मुखतेचे उदात्तीकरण झाले आणि अंतर्मुखतेचे अवमूल्यन सुरू झाले.

शिक्षणव्यवस्थेत हा भेद प्रकर्षाने दिसून येतो. वर्गात सतत बोलणारे, प्रश्न विचारणारे, चर्चेत आघाडी घेणारे विद्यार्थी 'हुशार' मानले जातात, तर शांतपणे ऐकणारे, मनन करणारे विद्यार्थी दुर्लक्षित राहतात. अनेक अंतर्मुख विद्यार्थी अभ्यासात उत्कृष्ट असतानाही केवळ त्यांच्या स्वभावामुळे शिक्षकांच्या अपेक्षांमध्ये बसत नाहीत. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून ही प्रक्रिया 'संस्थात्मक पक्षपात' दर्शवते, जिथे एक विशिष्ट व्यक्तिमत्त्व प्रकार सर्वसाधारण मानक ठरतो आणि इतरांना दुय्यम मानले जाते. कार्यस्थळावरही अंतर्मुख व्यक्तींना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मीटिंगमध्ये सातत्याने बोलणे, स्वतःच्या कामाची जाहिरात करणे, मोठ्या सामाजिक जाळ्यात सक्रिय राहणे यांना यशाचे मापदंड मानले जातात. अशा वातावरणात अंतर्मुख कर्मचारी मागे पडतात. मात्र संशोधनातून असे स्पष्ट होते की अंतर्मुख व्यक्ती निर्णयक्षम, सखोल विचार करणाऱ्या, दीर्घकालीन नियोजनात कुशल आणि नैतिक मूल्यांना प्राधान्य देणाऱ्या असतात. समाज त्यांच्या या गुणांकडे दुर्लक्ष करतो, ही सामाजिक विसंगती आहे.

लिंगभावाच्या संदर्भात अंतर्मुखतेचा अनुभव अधिक गुंतागुंतीचा ठरतो. पुरुषप्रधान समाजात बोलकेपणा, आत्मविश्वास आणि आक्रमकता हे पुरुषी गुण मानले जातात. शांत, अल्पसंवादी स्त्रियांना अनेकदा दुर्बल, दबलेली किंवा अक्षम ठरवले जाते. प्रत्यक्षात अनेक अंतर्मुख स्त्रिया कुटुंब, शिक्षण, संशोधन, सामाजिक सेवा आणि सर्जनशील क्षेत्रांत मोलाचे योगदान देत असतात. मात्र त्यांचा आवाज कमी असल्यामुळे त्यांचे कार्य पुरेसे प्रकाशात येत नाही. समाजशास्त्र ही स्थिती 'अदृश्य श्रम' म्हणून ओळखते.

आजच्या डिजिटल युगात अंतर्मुख व्यक्तींना नवे व्यासपीठ मिळाले आहे. लेखन, संशोधन, कला, ऑनलाईन शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्या स्वतःला व्यक्त करू शकतात. सोशल मीडियावरील गोंगाटापेक्षा सखोल आशय निर्माण करणाऱ्या अंतर्मुख व्यक्ती समाजाच्या वैचारिक संपत्तीत भर घालत आहेत. तरीही 'लाइक', 'शेअर' आणि 'व्हायरल' संस्कृतीमुळे बहिर्मुखतेलाच अधिक महत्त्व दिले जाते. त्यामुळे अंतर्मुखतेला खरी मान्यता मिळण्यासाठी अजूनही संघर्ष करावा लागतो. जागतिक अंतर्मुखी दिन साजरा करण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे समाजाने स्वतःच्या मूल्यप्रणालीचा पुनर्विचार करावा. व्यक्तिमत्त्वाचा एकच साचा योग्य नसतो. समाजाची खरी ताकद विविधतेत असते. बहिर्मुख व्यक्ती समाजाला गती देतात, तर अंतर्मुख व्यक्ती समाजाला दिशा देतात. एकाशिवाय दुसरे अपूर्ण आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समावेशक समाज म्हणजे सर्व प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांना समान संधी आणि सन्मान देणारा समाज.

अंतर्मुख व्यक्तींना बदलण्याचा आग्रह धरण्याऐवजी समाजाने त्यांना समजून घेणे आवश्यक आहे. 'जास्त बोला' या सल्ल्याऐवजी 'तुमचे विचार महत्त्वाचे आहेत' ही भावना निर्माण झाली पाहिजे. शैक्षणिक संस्था, कार्यस्थळे आणि सामाजिक मंचांनी शांत विचारांना, सखोल अभ्यासाला आणि अंतर्मुख सर्जनशीलतेला वाव दिला पाहिजे. यामुळे समाज अधिक समतोल, संवेदनशील आणि विवेकी बनेल.

जागतिक अंतर्मुखी दिन हा केवळ एका दिवसाचा उत्सव नसून तो समाजाच्या आत्मपरीक्षणाची संधी आहे. आपण शांततेला कसे पाहतो, कमी बोलणाऱ्यांना कसे वागवतो आणि वेगळेपणाला कितपत स्वीकारतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. गोंगाटातच शक्ती असते असा गैरसमज दूर करून शांततेतील सामर्थ्य ओळखणे ही काळाची गरज आहे.

अंतर्मुख व्यक्ती समाजाच्या कडेला उभ्या नसून त्या समाजाच्या मुळाशी आहेत. त्यांच्या शांत विचारांतूनच नव्या कल्पना जन्माला येतात, त्यांच्या संयमातूनच स्थैर्य निर्माण होते आणि त्यांच्या सखोल दृष्टिकोनातूनच समाजाला दीर्घकालीन दिशा मिळते. म्हणूनच जागतिक अंतर्मुखी दिन हा अंतर्मुखतेचा गौरव करण्याचा, तिच्या सामाजिक मूल्याची जाणीव करून देण्याचा आणि मानवी विविधतेचा सन्मान करण्याचा महत्त्वपूर्ण दिवस ठरतो.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान 1 वरून पुढे...

## 76 रुग्णांची....

७६ रुग्णांची केली तपासण१६ रूग्णांवर होणार मोतीबिंदू शस्त्रक्रिया-शिबिरात ७६ अधिक रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून १६ रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया होणार आहेत . नेत्र तपासणी शिबिरात डॉ . गोपाळघरे मॅडम यांच्यासह टीमचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचेही पत्रकार अशोक शिंदे मित्र परिवाराने आभार मानले आहेत .

## तुकाराम बारामते...

विषयाचे अत्यंत उत्कृष्ट अध्यापन करत अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची प्रेरणा दिली.त्यांचे इंग्रजी विषयावरील प्रभुत्व व विद्यार्थ्यांशी समरूप होण्याच्या प्रवृत्ती मुळे अत्यंत कमी कालावधीत त्यांचे शैक्षणिक काम परिसरात, संस्थेत तसेच तालुक्यात सर्वदूर पोहोचले. त्यांच्या या कार्याची दखल घेत शेतकरी शिक्षण संस्थेच्या रौप्य महोत्सव निमित्त वितरित होणाऱ्या शिक्षण क्षेत्रातील राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी त्यांची निवड केली व दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी आष्टी येथे त्यांना माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रधान करण्यात आला. यावेळी मुलगी प्रणिती तुकाराम बारामते पत्नी सुवर्णा तुकाराम बारामते सह आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल लोकमान्य शिक्षण संस्थेचे सचिव

◆ पान 1 वरून पुढे...

एडवोकेट हनुमंत रावजी थोरवे साहेब, युवा नेते धैर्यशील थोरवे साहेब तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक बापू गाडे सर, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, सालेवडगावचे सरपंच महेश कराळे, उपसरपंच सिदु हजारे, माजी सरपंच महादेव डोके तसेच समस्त ग्रामस्थ सालेवडगाव यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

## माजी विद्यार्थ्यांच्या...

गांडगे सर,सुभाष अजबे, लक्ष्मण मुंडे,ॲड मॅचिंद डोगरदिवे,ॲड मुकुंद जोशी,सुशांत काळे,विनायक राऊत,आसाराम खटावकर,बाबासाहेब डावरे संदीप खटावकर, बकट काळे,विक्रम कोळपे अश्विनकुमार डावरेसर,सय्यद मोबिन,विष्णुपंत नेमाटे,सचिन अजबे,माऊली अजबे,,गणेश कोळपे,दत्ता आवाड, आसेफ सय्यद, लक्ष्मण शिंगाडे,पप्पू अजबे,गोविंद शिंगाडे,राजेंद्र चाळक,सर्जेराव जाधव,नॅनोबा जाधव, त्रिंबक पायके,चव्हाण सर,शिंदे सर,भारत राठोड,आडे सर,लिगस्कर सर,हे उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप चाळक उपाध्यक्ष संदीप माने यांनी व सदस्यांनी विशेष मेहनत घेतली होती.

## अपक्ष नगरसेवक...

नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांना जाहीर

◆ पान 1 वरून पुढे...

पाठिंबा दिला आहे. नगर परिषद निवडणुकीत धनंजय मुंडे यांच्या सह मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी नगर परिषद निवडणुकीत एकहाती सत्ता मिळवली होती. त्यानंतर आज अपक्ष म्हणून निवडून आलेल्या तीन नगर सेवकांनी जाहीर पक्ष प्रवेश केला आहे. याप्रसंगी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## फायटर व लोखंडी...

यांच्यावर ठेवण्यात आले. ज्याचा आर.सी.सी.नं.७२०/२०२२ त्यामध्ये फिर्यादी व साक्षीदारांचा जवाब नोंदवण्यात आला. साक्षीदार फिर्यादी माऊली बाबासाहेब परसे व चार साक्षीदारांचा जवाब नोंदवण्यात आला . प्रकरण अंतिम व्यक्तिवादास ठेवण्यात आले . त्यावर आरोपीच्या वकिलामार्फत ड.ज्ञानेश्वर डी.मस्के यानी व्यक्तिवाद केला. आरोपीचे वकील ड.ज्ञानेश्वर डी. मस्के यांचा युक्तिवाद ग्राह्य ठरवून मा.कोर्टाने तिन्ही आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

## इलेक्ट्रॉनिक काट्यांची...

इतकीच आहे. या नियमामध्ये कोणताही बदल झालेला नाही. व्यापाऱ्यांसाठी महत्त्वाची सूचना व्यापारी बांधवांनी चुकीच्या माहितीवर

◆ पान 1 वरून पुढे...

विश्वास न ठेवता अधिकृत अधिसूचना व वैध मापनशास्त्र विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन - (गणेश भ. मिसाळ) निरीक्षक, वैध मापनशास्त्र बीड विभाग, बीड ई-मेल : beedaclmyahoo.in यांनी केले आहे.

## पालकमंत्र्यांना काळे...

राहत्या घरातून ताब्यात घेऊन लिंबागणेश पोलिस चौकीत स्थानबद्ध केले. पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवू नयेत म्हणून कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले जात आहे; पण शाळकरी मुलांचे हाल थांबवण्यासाठी प्रशासनाकडे वेळ नाही, असा घणाघाती आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे. दरम्यान, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद बीड डॉ. किरण कुंवर यांनी दत्तनगर वस्तीशाळेच्या तक्रारीची दखल घेतली असून, तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व संबंधित ग्रामपंचायतीमार्फत योग्य ती कार्यवाही करून शाळेसाठी तातडीने रस्ता उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन पत्रकाद्वारे दिले आहे. तसेच आंदोलन स्थगित करून प्रशासनास सहकार्य करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे. तरीही, विद्यार्थ्यांचा रस्ता प्रश्न त्वरित मार्गी न लागल्यास येत्या सोमवारी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात गाडी अडवण्याचा इशारा डॉ. गणेश ढवळे यांनी दिला असून, या घटनेमुळे बीड जिल्ह्यात प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## जनतेच्या पैशातून...

ही आनंदाची बाब आहे. बीड जिल्ह्यात एकाच वेळेस एवढ्या विकासकामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन होत आहेत, त्यामध्ये आपणा सर्वांची साथ असल्याचेही ते म्हणाले. जिल्हा परिषद, जिल्हा सैनिक कार्यालय व इतर कार्यालयांच्या माध्यमातून जिल्ह्यात चांगले काम होत आहे. त्याला जनतेचीही साथ आहे, त्यामुळे येथील जनतेला जनतेला धन्यवाद देतो, असेही पवार म्हणाले. यासह त्यांनी जिल्ह्यात देण्यात आलेल्या भरीव निधीबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये त्यांनी बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी निधी सह शासन मान्यता दिल्याचे आवर्जून सांगितले. बीड-परळी रेल्वे, भूसंपादनाची आवश्यकता, रेल्वेचे इलेक्ट्रीफिकेशन, ऊसतोड कामगारांसाठी उर्वरित पाच तालुक्यात वस्तीगृहे, अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयाचा बृहत आराखडा, सीट्रीपल आयटी, आरोग्य सुविधा वाढविण्यासाठी नियोजन, रेशीम उत्पादन भरभराटीसाठी सिल्क पार्क, विज्ञान उद्यान, तारांगण पार्क, पुरातन वास्तूंचे जतन, बीडसाठी दरदिवसाला पाणी मिळावे यासाठीचे नियोजन आदी बाबींवरही त्यांनी उपस्थितांना माहिती दिली. सहकार मंत्री पाटील म्हणाले, केंद्र, राज्यपातळीवरील सहकार विभागाचे काम उत्तम आहे. राज्याने सहकार क्षेत्रात भरीव काम केले आहे, या सहकाराच्या माध्यमातून राज्याची ओळख जगभर आहे. येणाऱ्या काळामध्ये तरुणांच्या हाताला काम, महिलांचे सक्षमीकरण सहकार क्षेत्रातून मोठ्याप्रमाणात करण्यात येणार आहे. सहकारी चळवळीला अधिक गतिमान करण्यावर शासनाचा भर आहे. बीड जिल्ह्यामध्ये सहकार भवनाची आवश्यकता होती, म्हणून १४ कोटी ९८ लाख एवढ्या रकमेचे सहकार संकुल याठिकाणी उभे राहत आहे, ही आनंदाची बाब असल्याचे सांगत सहकार विभागाशी संबंधित १० कार्यालये एकाच ठिकाणी या संकुलामध्ये राहतील. त्यामुळे नागरिकांची सोय होणार असल्याचेही ते म्हणाले. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्ज्वलनाने व, राष्ट्रगीत, राज्यगीताने झाली. प्रास्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

## अंबाजोगाईकरांसाठी...

बंद पडत असल्याने रुग्णांची मोठी गैरसोय होत होती. रुग्णांची होणारी ही फरफट थांबवण्यासाठी केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी शासनाकडे या विषयाचा जोरदार पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन राज्य सरकारने सीटी स्कॅन मशिन, इन्स्टॉलेशन, विद्युत काम आणि विशेष बांधकाम यासाठी सुमारे १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. या निधीतून कॅनन कंपनीची २५६ स्लाईस क्षमता असलेली अत्यंत अत्याधुनिक मशिन रुग्णालयात दाखल झाली. या मशिनमुळे अत्यंत सूक्ष्म तपशिलांसह (डिटेल रिपोर्ट) आणि अधिक स्पष्टतेसह अहवाल मिळणार असून, यामुळे डॉक्टरांना आजाराचे अचूक निदान करणे सोपे होणार आहे. या मशिनसाठी रुग्णालयात स्वतंत्र १२ हजार स्क्वेअर फूट जागेत विशेष बांधकाम करण्यात आले असून हा संपूर्ण विभाग वातानुकूलित करण्यात आला आहे. नवीन मशिन सुरू होण्यास तांत्रिक विलंब होत असताना आ. मुंदडा यांनी पुन्हा प्रशासकीय पातळीवर हालचाली केल्या, परिणामी हे काम युद्धपातळीवर पूर्ण झाले. मात्र आता नवीन वर्षाच्या मुहूर्तावर या नवीन मशिनची यशस्वी चाचणी झाल्याने

◆ पान ४ वरून पुढे...

गोरगरीब रुग्णांना ही सेवा शासकीय दरात उपलब्ध होणार असून त्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. या मशिनमुळे केवळ अंबाजोगाईच नव्हे तर शेजारील तीन ते चार जिल्ह्यांतील रुग्णांना वेळेवर उपचार मिळण्यास मदत होईल. अपघातातील रुग्णांचे प्राण वाचवण्यासाठी ही यंत्रणा मैलाचा दगड ठरेल असे मानले जात आहे.

## रणवीर पंडित...

स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अंतर्गत भव्य शारदा क्रीडा महोत्सव सुरू असून गुरुवार दिनांक १ जानेवारी रोजी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय पाचेगाव येथे मुलांच्या गटातील खो -खो स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सभा उपसभापती श्रीहरी पवार संचालक पांडुरंग मुळे, प्राचार्य राजेंद्र दाभाडे, सरपंच तुकाराम प्रधान, वराट, बिपीन डरपे, देविदास तर्फे,भागवानराव मते, श्रीकृष्ण वेताळ, मुन्ना हटवटे, पांडुरंग मुसळे, कृष्णा चव्हाण, अविनाश राठोड यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात आयोजक रणवीर पंडित म्हणाले की, क्रीडा महोत्सवात सातत्य ठेवून स्पर्धा आयोजित केल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण झाली त्यामुळे त्याला चार वर्षापासून होणाऱ्या या क्रीडा महोत्सवाला उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. यावेळी बोलताना प्राचार्य राजेंद्र दाभाडे म्हणाले गेवराई तालुक्यामध्ये जयभवानी जगदंबा शिक्षण संस्थेने शैक्षणिक संस्थेमुळे शैक्षणिक चळवळ गतिमान झाले आहे. शारदा क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून रणवीर पंडित यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी प्रोसाहित केले आहे. या निमित्ताने ग्रामीण भागात मैदाने उपलब्ध झाले. यातून चांगले खेळाडू घडतील आणि गेवराई तालुक्याचा नावलौकिक होईल असेही ते यावेळी म्हणाले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रीडा ध्वजारोहण, दिपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. मैदानाचे पुजन करुन उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंचा परिचय करून घेतला. यावेळी मुलांच्या गटात दोन मैदानावर सामने सुरु करण्यात आले. खो- खो स्पर्धेत संस्थेच्या आठरा शाळेचे संघ सहभागी झाले आहेत. यावेळी जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी खेळाडू तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते, क्रिडा प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## यशवंतराव चव्हाण...

पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत. व्यासपीठावर उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत आ. विजयसिंह पंडित यांच्याकडे सुपूर्द केली. राज्य शासनाच्या नियोजन विभागाने दि.१ जानेवारी २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयात बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नुतणीकरणासाठी ८.१९ कोटी रुपये किंमतीच्या विकास कामास शासन मान्यता दिली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार साहेब यांनी नववर्षाच्या प्रथमदिनी बीडकरांना या माध्यमातून सुखद भेट दिली आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी या बाबत बीड शहरातील रसिक प्रेक्षक, नाट्यकर्मी व नागरीकांच्यावतीने पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ना. अजितदादा पवार यांनी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची दुरावस्था पाहिली होती, चर्चे

◆ पान ४ वरून पुढे...

दरम्यान त्यांना या बाबीची आठवण होताच त्यांनी तातडीने या बाबतची संचिका मागवून घेऊन त्यास मंजुरी दिली. त्यामुळे नववर्षाच्या प्रथमदिनी बीड शहरातील विकासपर्वाचा प्रारंभ या माध्यमातून होऊ शकला. बीड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर पडेल असे दर्जेदार काम यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे करण्यात येईल असेही आ. पंडित यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, बीड शहराच्या विकासासाठी भविष्यात निधी कमी पडू दिला जाणार नाही असे आश्वासन पालकमंत्री ना. अजितदादा पवार साहेब यांनी दिले आहे. बीड शहरात भविष्यात दर्जेदार विकास कामे करून नागरीकांचा विश्वास संपादन करण्यासाठी आम्ही कटिबध्द असल्याचेही आ. पंडित यांनी सांगितले. मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला नाट्यगृहाच्या दुरावस्थेचा प्रश्न निकाली निघाल्याबद्दल बीड शहरातील नागरीक, नाट्यकर्मी, कलावंत, रसिक प्रेक्षक यांनी आनंद व्यक्त केला आहे.

## कल्याण-लातूर...

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा कणा ठरणार असल्याचे जगताप यांनी स्पष्ट केले. बीड जिल्ह्यातील दूध, सीताफळ, लिंबू, सोयाबीनसह नाशवंत शेतीमालाला जलद बाजारपेठ उपलब्ध होण्यासाठी हा महामार्ग अत्यंत उपयुक्त ठरेल. मुंबई, पुणे, कल्याण तसेच जेएनपीटीमार्गे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी थेट संपर्क साधला जाऊन शेतकऱ्यांचा वाहतूक खर्च, वेळ व इंधन बचत होईल, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे. तसेच महामार्गालगत औद्योगिक वसाहती, गोदामे, प्रक्रिया उद्योग, लॉजिस्टिक हब उभारणीला चालना मिळून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. दुष्काळ, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी व स्थलांतराच्या समस्यांनी ग्रस्त असलेल्या बीड जिल्ह्यासाठी हा प्रकल्प विकासाची मोठी संधी असल्याचेही निवेदनात नमूद आहे. हा महामार्ग बीड जिल्ह्यापासून दूर नेण्यात आल्यास जिल्ह्याच्या भविष्यावर अन्याय होईल, अशी भावना शेतकरी, व्यापारी, युवक व नागरिकांमध्ये असल्याचे सांगण्यात आले. वेळेत सकारात्मक निर्णय न झाल्यास लोकशाही मार्गाने जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, बीड जिल्ह्यातील जनतेच्या भावना लक्षात घेऊन प्रस्तावित द्रुतगती महामार्ग मूळ नियोजनानुसारच बीड जिल्ह्यातून व बीड शहराच्या जवळून राबविण्याचा तातडीचा निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## चुकांबद्दल माफी...

मला गेल्या दहा ते बारा वर्षाचा संघर्ष आठवतो. बीडच्या गेवराई तालुक्यातील गावात जन्म झाला. माझे वडील ग्रामपंचायतीचे सरपंच देखील नाहीत. शेतकऱ्यांसाठी काम केल्यानं वयाच्या २१ व्या वर्षी पंचायत समिती म्हणून काम केलं. शेतकऱ्यांसाठी आयुष्य झोकून दिले, माझ्यावर पाच गुन्हे दाखल झाले. प्रत्येक कार्यकर्त्याच्या आयुष्यात हे होत नाही. महिलांचा, शेतकऱ्यांचा, शेतकऱ्यांच्या लाठ्या काठ्या खाल्ल्या. गुन्हे दाखल व्हायचे तेव्हा पोलीस स्टेशनला पाच सहा तास, दोन दोन दिवस झोपलेले. वकिलांचे फी भरण्यासाठी पैसे नसायचे. संघर्ष करत राहिले, असं म्हणत पूजा जाधव पत्रकार परिषदेत रडू लागल्या. छत्रपती संभाजीराजे यांच्या मराठा क्रांती मोर्चामध्ये काम करत असताना त्यांनी एकत्र आणलं आणि लग्न झालं. लग्नानंतर दुसऱ्या दिवशी बाहेर पडले आणि प्रभागासाठी

◆ पान ४ वरून पुढे...

काम करायला लागले. शेतकरी विरुद्ध कारखानदार असा संघर्ष केला. लग्नानंतर २० ते २३ दिवसानंतर काश्मीर गेलेलो होते, तिथं हल्ला झालेला होता.रक्तात चळवळ होती, संघर्ष होता आम्ही घरातून बाहेर पडलो, महाराष्ट्रातील लोकांना बाहेर काढलं,देवेंद्र फडणवीस यांना व्हिडिओ कॉल केलेला. व्हायरल झालेला व्हिडिओ ती एका तासात दिलेली प्रतिक्रिया होती. दहशतवाद्यांना आपल्या देशात हिंदू-मुस्लीम करायचं होतं. तीन तासानंतर वातावरण बदललं होतं, त्यानंतर प्रतिक्रिया आल्या खरंच त्यांना धर्म विचारुन मारल्याचं समोर आलं, हे देखील सांगितलं होतं, पण ते लोकांपर्यंत गेलं नाही. पक्षाच्या वरच्या लेव्हलला मोठ्या मोठ्या घडामोडी घडत असतात त्याचं विक्टीम झाले. पहलगाम आणि काश्मीरचा हल्ला धर्म विचारुन झालेला आहे हे सांगितलं होतं. मात्र, ते खालीपर्यंत पोहोचू शकले नाही, असं पूजा जाधव हिनं म्हटलं. प्रभाग क्रमांक १ आणि २ ची तयारी करत असताना सामान्य घरची मुलं उमेदवारी आणतात हे अनेकांना सहन होत नाही.विरोधकांची प्रभागाची टीम आहे. त्याची विक्टिम मी बनत आहे. राहुल गांधीचा वीडियो व्हायरल होतोय. तेव्हा शेतकऱ्यांचा प्रश्न घेऊन मी राहुल गांधीकडे घेऊन गेले होते, असंही पूजा जाधव म्हणाली.

## ग्रामीण भागातील...

बदामरावजी आबा पंडित, भाजप नेते बाळराजे पवार, युवा नेते युध्दाजित पंडित, तालुका कृषी अधिकारी गिरी, माजी जि.प. सदस्य बप्पासाहेब तळेकर, कृषी उद्यान पंडित, राजेंद्र आतकरे, युवा नेते राजेंद्र मोटे, अजय दाभाडे, अमोल करांडे, मधुकर तौर, बाळासाहेब सानप, भागवत जाधव, विनोद नरसाळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना साखरसाम्राट बाबुराव बोत्रे पाटील म्हणाले की, आज अनेक परदेशांमध्ये शेती तंत्रज्ञान प्रचंड वेगाने विकसित झाले असून आधुनिक यंत्रणा, डिजिटल प्रणाली व संशोधनाच्या आधारे त्यांनी शेती क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. मात्र कृषीप्रधान देश असलेला भारत या बाबतीत काही प्रमाणात मागे राहिला आहे. अशा परिस्थितीत महेश बेदरे यांनी ग्रामीण शेतकऱ्यांसाठी उभारलेले हे कृषी प्रदर्शन आणि कृषिरथ हे शेती क्षेत्राला नवी दिशा देणारे असून शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी मोलाचे ठरणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेवराई तालुक्यात गेल्या १८ वर्षांपासून सातत्याने आयोजित करण्यात येणाऱ्या या कृषी प्रदर्शनामुळे शेतकऱ्यांच्या शेतीत सकारात्मक बदल घडून आले आहेत, असे सांगून ते पुढे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली असून येथील ऊस आज सोलापूर, धाराशिवसह इतर अनेक जिल्ह्यांत पाठविला जात आहे. हेच या प्रदर्शनाचे यश असून भविष्यातही या माध्यमातून शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती मिळून त्यांचे उत्पादन व उत्पन्न निश्चितच वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, या भव्य व शिस्तबद्ध कृषी प्रदर्शनाच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल त्यांनी कृषिभूषण महेश बेदरे यांचे तोंडभरून कौतुक केले.यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना माजी मंत्री बदामराव पंडित म्हणाले की, या कृषी प्रदर्शनाच्या पहिल्या वर्षापासून आजपर्यंतचे १८ वर्षांचे यशस्वी प्रवासाचे आपण साक्षीदार आहोत. या प्रदर्शनामुळे गेवराई तालुक्यासह परिसरातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होत असून येणाऱ्या काळातही शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन दिशादर्शक ठरेल, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महेश बेदरे यांनी केले, सूत्रसंचालन मयूरध्वज औटी यांनी केले तर शिनुभाऊ बेदरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# वेरूळ- घृष्णेश्वर विकास आराखड्याची कामे विहित मुदतीत पूर्ण करा- अपर मुख्य सचिव बी. वेणू गोपाल रेड्डी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

वेरूळ घृष्णेश्वर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामे विहित मुदतीत पूर्ण करा. या विकासात स्थानिकांच्या गरजांना प्राधान्य द्या. तसेच स्थानिक रहिवाशांचा सहभाग विकास प्रक्रियेत घ्यावा, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी वेणू गोपाल रेड्डी यांनी आज वेरूळ येथे दिले.

श्रीक्षेत्र घृष्णेश्वर व वेरूळ तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या प्रगतीपथावरील कामांची पाहणी आज श्री. रेड्डी यांनी केली. यावेळी त्यांचे समवेत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, जिल्हा नियोजन



अधिकारी भारत वायाळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे कार्यकारी अभियंता दीपक कोळी, भारतीय पुरातत्व विभागाचे शिवकुमार भगत, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड तसेच अन्य विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी श्री रेड्डी यांनी सुरू असलेल्या विकास कामांची पाहणी केली. घृष्णेश्वर मंदिर परिसर दर्शनासाठी



आलेल्या भाविकांसाठी मार्गिका, प्रगतीपथावर असलेले विश्रामगृह, सुविधा केंद्र आदी विविध कामांची पाहणी त्यांनी केली.

त्यानंतर झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी सूचना केल्या की, तीर्थक्षेत्र विकास सुविधांची कामे करताना स्थानिकांच्या गरजांना प्राधान्य दिले पाहिजे. तसेच त्यांच्या गरजांना प्राधान्य दिले गेले पाहिजे. स्थानिक कारागिरांनी तयार केलेली उत्पादने तसेच कलावस्तू यांच्या विक्रीसाठी जागा उपलब्ध करून द्यावी. या वस्तू व उत्पादने येणाऱ्या पर्यटकांना खरेदीसाठी उपलब्ध व्हाव्या. तसेच स्थानिक खाद्य संस्कृती, कला यांचेही सादरीकरण पर्यटकांना व्हावे. भाविकांसाठीचे पादचारी मार्ग, वाहनांचे पार्किंग तसेच शैक्षणिक सहलींचाही विचार या आराखड्यात करण्यात यावा. सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्यात यावा अशा सूचना श्री. रेड्डी यांनी यावेळी केल्या. या बैठकीस भारतीय पुरातत्व विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग पर्यटन विकास महामंडळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वनविभाग अशा विविध विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते.

## सार्वजनिक स्वच्छालय बीड शहरात तात्काळ बनवण्यासाठी अजित दादा पवार यांना ॲड. करांडे यांचे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषद आपल्या ताब्यात आली असुन बीड शहरातील लोकांना सार्वजनिक स्वच्छतागृह महिला व पुरूष यांना (मुत्री) चि निकांत गरज आहे बीड शहरातील सार्वजनिक शुलभ शौचालय अती तात्काळ बणवण्यात यावे.

छत्रपती संभाजी महाराज क्रिडा संकुल (मल्टीपर्पज ग्राऊंड) या ठिकाणी सुरक्षा रक्षक तैनात करून विद्युत व्यवस्था परिपूर्ण पद्धतीने कार्यरत करणे अशी महिलांच्या वतीने मोठ्या प्रमाणत मागणी आहे की, याचे कारण की, या क्रिडागणांच्य अंधार असणाऱ्या भागामध्ये दारू पिवुन लोकांचा वावर आहे. बीड शहरामध्ये अवेळी येणाऱ्या पिणाच्या पाण्याची शेडुल करून सकाळी ६ ते १० अथवा सायंकाळी ६ ते १० या वेळेत पाण्याचे बितर होणे बीड शहरात होणे गरजेचे आहे. बीड शहरातील सर्व शासकीय कार्यालयातील मुत्र्या व स्वच्छता ग्रह कार्यन्वीत करणे गरजेचे आहे. बीड शहरातील कचऱ्याचे व्यवस्थान व्यवस्थीत करणे गरजेचे आहे. बीड शहरामध्ये अंडरग्राऊंड गटार योजना तयार केलेली असून मागील ७ वर्षापासुन त्यामध्ये एक थेंब देखील गटाराची पाणी सोडण्यात आले नाही ही फसवी योजना चुकीच्या पद्धतीने अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यावर, नेत्यांवर, वरील मागण्यांचे निवेदन आज जिल्हा दौऱ्याला असणारे बीडचे पालकमंत्री तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना दिले असून त्यांनी तात्काळ अंमलबजावणी करण्यास सांगितले..

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात हजरत अली जन्मदिवस, संत भगवानबाबा पुण्यतिथी, अंगारक चतुर्थी, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती, मकर संक्राती आणि मराठवाडा विद्यापीठ नामांतर वर्धापनदिन सोहळा या सण, उत्सव आणि महानगरपालिका मतदान आणि मतमोजणी प्रक्रिया, तसेच आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि.१६ जानेवारी २०२६ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. १६ जानेवारी २०२६ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.



*सहकार खात्यातील लेखापरीक्षकांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्राचे सहकार मंत्री मा. श्री.बाबासाहेब पाटील साहेब यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले-. यावेळी बीड जिल्ह्यातील लेखापरीक्षक श्री बोरखेडे.एस.एस., आजबे. एस.के., चव्हाण. एस.यु.शिंदे गणेश,एस.पी.बेहरे, सातपुते. पी.आर.,सातपुते.टी. एस.,आसलकर.ए.सी., कुंडलकर. डी. एस.खोडसे.सी.ए., मनोज डोंगरे ,गणेश करांडे इ.उपस्थित होते.*



*मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव काठोडा ता. जि. बीड येथे नवीन वर्षाचा पहिला दिवस असल्याने नवीन वर्षाची सुरुवात हि वृक्ष लागवड करून करण्यात आली.व हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र मोहीम राबवण्यात आली. यावेळी उपस्थित संस्थेचे उपाध्यक्ष विशाल डोळस,तेजस पवार,रोहन डोळस,सदस्य व गावकरी उपस्थित होते*

## संघर्षात सावली, लढ्यात ढाल – नाना काळकुटेंचा समाजसेवेचा सन्मान

### मराठा समाजासाठी ढाल बनून उभे राहणाऱ्या नानांच्या कार्याला राष्ट्रीय पातळीवर दखल

**नेकनूर । प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या लढ्यात मनोज दादा जरांगे पाटील यांची सावली म्हणून कायम त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेले गंगाधर नाना काळकुटे हे नाव आज मराठा समाजात विश्वासाचे आणि निष्ठेचे प्रतीक बनले आहे. मराठा समाजासाठी तन-मन-धन अर्पण करून अखंड कार्य करणाऱ्या या समाजसेवकाचा नुकताच दिल्ली येथे प्रतिष्ठित पुरस्कार देऊन



सन्मान करण्यात आला.

मनोज दादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मराठा आरक्षण चळवळीत गंगाधर नाना काळकुटे यांनी सुरुवातीपासून महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आंदोलन असो, समाजातील अन्यायाविरोधातील आवाज असो किंवा कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावण्याचे काम असो-प्रत्येक ठिकाणी नाना काळकुटे हे दादांच्या पाठीशी ढाल बनून उभे राहिलेले दिसतात. नाना आणि दादा हे समीकरण आज मराठा समाजात घट्ट नात्याचे प्रतीक मानले जाते.दैनिक सूर्योदय व डिजिटल माध्यमांच्या माध्यमातून समाजातील प्रश्न, आरक्षणाचा लढा आणि मराठा समाजाच्या भावना जनतेपर्यंत पोहोचवण्याचे काम नानांनी सातत्याने केले. संघर्षाच्या काळात अनेक अडचणी, दबाव आणि टीका सहन करूनही ते डगमगले नाहीत. समाजासाठी निष्ठेने उभे राहणे, हेच त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य राहिले आहे.

दिल्ली येथे झालेल्या या सन्मानामुळे नाना काळकुटे यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली असून, मराठा समाजात समाधान आणि अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. हा पुरस्कार वैयक्तिक नसून संपूर्ण मराठा समाजाच्या संघर्षाचा सन्मान आहे, अशी प्रतिक्रिया यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी दिली.

मनोज दादा जरांगे पाटील आणि गंगाधर नाना काळकुटे यांचे हे घट्ट नाते, संघर्ष आणि निष्ठेची सांगड घालणारे ठरत असून, आगामी काळातही मराठा समाजाच्या हक्कांसाठी हे दोघे खांद्याला खांदा लावून लढत राहतील, असा विश्वास समाजातून व्यक्त होत आहे.

## नायगाव येथे ३ जानेवारीला क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंतीउत्सव व भव्य स्मारक भूमिपूजन सोहळ्यास उपस्थित रहावे : ॲड.सतीश शिंदे

**बीड । प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दि. ३ जानेवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले जन्मगाव नायगाव तालुका खंडाळा जिल्हा सातारा येथे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंती उत्सव सोहळा तसेच ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले स्मारक भूमिपूजन समारंभ भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे. हा स्मारक भूमिपूजन सोहळा राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते सकाळी १०.३० वाजता संपन्न होणार आहे. या




सोहळ्यास महाराष्ट्रातील महात्मा फुले युवा दलाचे प्रमुख पदाधिकारी, जिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख व कार्यकर्त्यांसह समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड.सतिश शिंदे यांनी केले आहे. क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचे जन्मगाव नायगाव ता.खंडाळा जि.सातारा येथे जयंती उत्सव व स्मारकाचे भूमिपूजन सोहळा संपन्न होणार असून या सोहळ्यासना. मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे, ओबीसी कल्याण, दग्धविकास, उर्जा नुतनीकरण मंत्री ना.अतुल सावे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ना. जयकुमार गोरे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनराव भुजबळ,पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे, पर्यटन तथा पालकमंत्री ना.शंभूराज देसाई, मदत व पुनर्वसन मंत्री ना.मकरंद पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंह राजे भोसले, महिला व बालविकास मंत्री ना. आदिती तटकरे आदी मंत्री महोदय यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच अनेक आमदार, खासदार व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास महात्मा फुले युवा दलाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी व समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे

## संतती असेल चांगली तरच खर्या अर्थाने असते ती संपत्ती: साध्वी प्रतिभाकवरजी म. सा.

**बीड । प्रतिनिधी**

सुखाचे क्षण मिळतात ते पुण्याच्या उदयाने. तर पाप भोगावे लागते आपण केलेल्या कर्म बंधनाने. मात्र हे सुख उपभोगले जाते ते केवळ संपत्तीच्या आधाराने. तर ही संपत्ती कशी असावी यावर मंथन केले आज जैन आराधना प्रवचन मालेत गुंफलेल्या पाचव्या पुष्पाने. यावर बोलताना साध्वी प्रतिभाजी म्हणाल्या, पैसा हाच सर्व काही संपत्तीचा भाग नाही. केवळ पैसा आहे म्हणून सुख लाभते असेही काही होत नाही. अमाप पैसा जवळ आहे, मात्र संतती आपल्या जवळ नाही, ती परदेशात वास्तव्याला आहे. तर आपलेपणाचे सुख आपणास लाभते काय? यासाठी त्याला



आपलेपणाची, जवळीकतेची, संस्काराची गरज आहे. व ते लहानपणीच मुलांवर रुजायला हवेत. लहानपणी तो मागील तसे वागवणे त्याचे लाड कोड कौतुक करणे यातून त्याला आपले पणाची भावना राहत नाही. व तो मिळणार्या पश्चिमात्य संस्कृतीने स्वार्थाला बळी पडतो. त्यासाठी त्याच्यावर आपलेपणाच्या संस्काराची यासाठी त्याला द्यावयाच्या सुसंपत्तीला सुविचाराची आवश्यकता लागते. ज्यातून श्रद्धा बळावते आणि तो सात्विक विचाराला समर्थ बनतो. प्रेम आपलेपणा टिकवण्यासाठी एकत्रित पणाची आवश्यकता लागते म्हणूनच संतती असेल चांगली तरच संपत्ती होती ही खर्या अर्थाने आपली हे म्हणण्याची वेळ येते. आपण संपत्तीच्या जीवावर स्वयंपाक्याच्या हातून आपले अन्न शिजवतो. उदरनिर्वाहाला ते योग्य असते. मात्र त्यातून प्रेम आपलेपणाला ते मुकलेले असते त्यासाठी स्वतः केलेले अन्न जळाले तरी ते रुचकर लागते, यासाठी आपण एकत्रितपणाने परस्परावर प्रेम करावे असेही त्या म्हणाल्या. तर प्रवचनाच्या प्रारंभी साध्वी पु.श्री सुमतीकवर म.सा. यांनी आपले विचार मांडले, त्या म्हणाल्या पश्चिमात्य संस्कृतीला आपण एवढे रुजलो की, सकाळी सुप्रभात म्हणण्या ऐवजी गुड मॉर्निंगने दिवसाची सुरुवात करतो.

## भीमराव वाघचौरे यांच्या प्रयत्नामुळे तारांगण आणि नाट्यगृहाचा प्रश्न मार्गी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील प्रभाग क्र.१३ मध्ये सायन्स पार्क,तारांगण यासाठी २८ कोटी रु.तर स्व.यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या दुरुस्तीसाठी ८ कोटी रु. निधी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांनी मंजुर केला आहे.या दोन्ही प्रकल्पासाठी या भागाचे नगरसेवक भीमराव वाघचौरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांचे स्वप्न साकार झाल्याबद्दल त्यांनी आ.विजयसिंह पंडित यांचे आभार मानले आहेत. प्रभाग क्र.१३ मधून या वर्षी नगर परिषद निवडणूक लढवताना भीमराव वाघचौरे यांनी आपल्या वचननाम्यामध्ये सायन्स पार्क व तारांगणचा उल्लेख केला होता. त्या संदर्भातील घोषणा उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांनी केली. या प्रकल्पासाठी २८ कोटी रु. निधी ही मंजुर केला आहे. ना. अजित दादा पवार ह्यांच्या दूरदर्शी नेतृत्वात बीडकरांसाठी भव्य असे सायन्स पार्क व तारांगण धानोरा रस्त्यावरील पंढरी येथे करण्याचे प्रशासनाने निश्चित केले आहे.सदरील प्रकल्पासाठी २८ कोटींची तरतूद जिल्हा नियोजन मधून करण्यात आली आहे.सायन्स पार्क - ज्यामध्ये चार माहिती केंद्रे, मध्यभागी तारांगण व विज्ञान उद्यान असेल. माहिती केंद्रे ही एआय व आभासी तंत्रज्ञानावर आधारित खेळ,मानव वंशीय इतिहास,प्रकृती शास्त्र व पर्यावरण ह्या मध्ये विभागलेली असतील .तारांगण - विविध ग्रह, तारे, उल्का, धूमकेतू , इंटर गॅलेटिक ऑब्जेक्ट, आकाशगंगा, नेब्युला अशा विविध गोष्टी, अत्याधुनिक यंत्रणा वापरून मातृभाषेत दुर्मिळ अशी माहिती देतील जी विद्यार्थीच नव्हे तर ज्येष्ठांच्या देखील ज्ञानात भर घालील.

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. मा.ये.वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १९१२/२०२५**

**केशरबाई मुळीक वि. निरंक**

ज्यापेक्षा **भिमराव पि.गणपती शिंदे,** हे दिनांक ११/०९/२०२५ रोजी बीड, ता.जि.बीड येथे मयत झालेली आहे, आणि तसेच अर्जदार-

१. शोभा भ्र. भिमराव शिंदे, वय ४५ वर्षे, धंदा. घरकाम, रा. बजरंग नगर, कॅनॉल रोड, बीड, ता.जि. बीड २. आकाश पि.भिमराव शिंदे, वय.२९ वर्षे, धंदा. शिक्षण, रा. वरीलप्रमाणे, ३. दिपक पि. भिमा शिंदे, वय.२८ वर्षे, धंदा. शिक्षण, रा.वरीलप्रमाणे ,४. सौ. पायल भ्र. किरण कदम, वय.२३ वर्षे, धंदा. घरकाम, रा. सौंदाण, ता. पाटोदा, जि. बीड

अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले आहेत, अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/ अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/ अर्जदारांना सदरहु मयत नामे भिमराव पि.गणपती शिंदे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख २२/०१/२०२६ ही आहे.**

आज दिनांक ०१ जानेवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**(ॲड. मनिषा अ. गडकर यांचे मार्फत)**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : १९१८/२०२५**

अर्जदार :- **१. शिवराम पि. लहानु ढेरे, ५० वर्षे, धंदा शेती, रा. पाली, ता. जि. बीड, २. रमेश पि. लहानु ढेरे, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ३.मंगल भ्र. विष्णु ढेरे, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ४. संजय पि. विष्णु ढेरे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे, ५. राणी भ्र. बाळासाहेब औटे, वय २९ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, ६.स्वाती भ्र. अशोक लोखंडे, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. बाळापुर, ता.जि.बीड, ७. मनिषा अशोक धायगुडे, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, रा. सिरसदेवी, ता. गेवराई, जि. बीड,८.राजु पि. प्रकाश ढेरे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. पाली, ता. जि. बीड, ९. रंजना भ्र. प्रकाश ढेरे, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे, १०.सुनंदा भ्र. सखाराम चव्हाण, वय ५८ वर्षे, धंदा - घरकाम, रा. कोळवाडी, ता. जि. बीड, ११. सरसाबाई भ्र. लहानु ढेरे, वय ६७ वर्षे, धंदा घरकाम, रा. पाली, ता.जि.बीड,**

विरुध्द निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी मयत नामे **लहानु पि. राणुजी ढेरे हे / हया दिनांक २१/०५/२०१४ रोजी पाली, ता.जि.बीड** येथे मयत झालेले असुन अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क.३ व ९ या मयताच्या मयत मुलाच्या पत्नी म्हणजेच मयताच्या सुना आहेत. अर्जदार क.४ ते ८ हे मयताचे नातु आहेत. अर्जदार क. १० ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क. ११ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १८/१२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**पुढील तारीख :- २९/०१/२०२६.**

**( मार्फत विधिज्ञ:- ॲड एस बी खाडे )**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १९२३/२०२५**

**राजु पि. प्रकाश ढेरे व इतर वि. निरंक**

मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

**अर्जदारः (१) राजु प्रकाश ढेरे, (२) आदर्श अशोक ढेरे अ.पा.क. आई मिना अशोक ढेरे (३) अमृता अशोक ढेरे अ.पा. क आई मिना अशोक ढेरे (४) आराध्या अशोक ढेरे अ.पा. क आई मिना अशोक ढेरे (५) मिना अशोक ढेरे, (६) रंजना प्रकाश ढेरे, (७) सरस्वती लहानु ढेरे, सर्व रा. पाली ता. जि. बीड**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी **मयत नामे प्रकाश लहानु ढेरे हे दिनांक ०९/०७/२०१५ रोजी मयत झालेले आहेत.**

अर्जदार क. १ हा मयताची मुलगा असून अर्जदार क. २ व ४ हे मयताचे नातु आहेत. तसेच अर्जदार क. ५ मयताची सुन व अर्जदार क ६ पत्नी व अर्जदार क ७ आई आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

सदरहु मयत नामे प्रकाश लहानु ढेरे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत प्रकाश लहानु ढेरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. **सदर प्रकरणात पुढील तारीख २८/०१/२०२६ आहे.**

आज दिनांक ०१/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचें शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ ॲड एस. बी. खाडे)**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शुक्रवार, दि. ०२ जानेवारी २०२६ ● पान ४

## खाकी वर्दीला काळिमा! पोलिसाचं 'भयानक कांड'; महिलेला गुंगीच्या गोळ्या देऊन केलं अत्याचार

बीड । प्रतिनिधी

एका विभक्त महिलेला लग्नाचे खोटे आश्वासन देऊन एका पोलिस कर्मचाऱ्याने फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आरोपीने पीडित महिलेच्या वैयक्तिक अडचणींचा फायदा घेत तिचा मानसिक आणि शारीरिक छळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी पीडित महिलेने बीड आणि धाराशिव येथील पोलिस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दिली असून सखोल चौकशीची मागणी केली आहे. पीडित महिला सन २०२२ पासून पतीपासून वेगळी राहत होती. या परिस्थितीचा फायदा घेत धाराशिव येथे कार्यरत असलेल्या एका पोलिस कर्मचाऱ्याने तिच्याशी संपर्क साधला. आपण पोलीस असल्याने न्यायालयीन कामात मदत करतो, असे सांगून त्याने तिचा विश्वास संपादन केला. तसेच स्वतःचे वैवाहिक आयुष्य बिघडले असून लवकरच घटस्फोट घेऊन तिच्याशी लग्न करणार असल्याचे आश्वासन दिले, असे तक्रारीत नमूद आहे. १० ऑगस्ट २०२५ रोजी आरोपीने महिलेला माजलगाव येथील एका लॉजवर नेले. तेथे लग्नाचे आश्वासन देत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप आहे. या वेळी आरोपीने काही औषधांचे सेवन केल्यामुळे महिलेला गंभीर दुखापत झाली. तिला रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले असून टाके घालावे लागल्याचेही तक्रारीत नमूद आहे. उपचाराचा खर्च आरोपीने ऑनलाइन पद्धतीने भरल्याची माहिती समोर आली असून तो पुरावा म्हणून महत्त्वाचा मानला जात आहे. काही दिवसांनंतर महिलेने लग्नाबाबत विचारणा केली असता आरोपीने नकार देत अपमानास्पद वागणूक दिली. आपण पोलीस असल्याने कुणीही आपले काही बिघडवू शकत नाही, अशी धमकी देत जातिवाचक शिवीगाळ केल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच खासगी फोटो व्हायरल करण्याची आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही नमूद आहे. या घटनेमुळे पोलिस दलातील काही व्यक्तींकडून कायद्याचा गैरवापर होत असल्याचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# वर्षअखेरीस बीड एसीबीचा मोठा दणका; पाटोद्याचा वनरक्षक लाच घेताना जेरबंद

बीड । प्रतिनिधी



२०२५ हे वर्ष संपायला अवघे काही तास शिल्लक असताना, बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने धडाकेबाज कारवाई केली आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील तोडलेल्या झाडांच्या वाहतुकीसाठी एक हजार रुपयांची लाच घेणाऱ्या पाटोदा वन परिक्षेत्र कार्यालयातील वनरक्षकाला बीडमधून अटक करण्यात आली आहे. पाटोदा वन परिक्षेत्र कार्यालयातील वनरक्षक दादासाहेब तेजराव येदमल याने तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली होती. तक्रारदार हे शेतातून तोडलेल्या वृक्षांची वाहतूक करत असताना, प्रत्येक खेपेसाठी १ हजार रुपये द्यावे लागतील, असा तगादा येदमल याने लावला होता. ही लाच स्वीकारण्यासाठी त्याने एक शक्कल लढवली. येदमल याने लाचेची रक्कम स्वतः न स्वीकारता, बीड-रायमोहा फाट्यावरील एका हॉटेलमध्ये काम करणाऱ्या दिगांबर चौधरी याच्याकडे देण्यास सांगितले. तक्रारदाराने पैसे हॉटेल कामगाराकडे सुपुर्द केले आणि याची माहिती वनरक्षक येदमल याला दिली. एसीबीने आधीच सापळा रचला होता, त्यामुळे पैसे स्वीकारल्याचे निष्पन्न होताच पथकाने थेट बीड शहरातील संत भगवानबाबा चौक परिसरात असलेल्या येदमल याच्या घरातून त्याला अटक केली. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले, अमोल खरसाडे, प्रदीप सुरवसे, अंबादास पुरी आणि मच्छिंद्र बीडकर यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. वर्षभराच्या शेवटच्या दिवशी झालेल्या या कारवाईने शासकीय विभागात खळबळ उडाली आहे.

# 76 रुग्णांची तपासणी 16 जणांवर होणार शस्त्रक्रिया

## नेकनूरचे पत्रकार अशोक शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्र तपासणी शिबीर

नेकनूर । प्रतिनिधी



वाढदिवस म्हटलं की पैशाचा अपव्यय असेच चित्र सध्यातरी दिसून येत आहे . अशा काळात नेत्र तपासणी , शस्त्रक्रिया यासारखे समाजपयोगी उपक्रम काळाची गरज बनली आहे याचा गोरगरिबांना लाभ होतो . त्यासाठी आणखीन अशा उपक्रमांचे आयोजन व्हावे , असे मत नेकनूर चे स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ अशोक हुबेकर यांनी व्यक्त केले. पत्रकार अशोक शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त नेकनूर (ता . बीड ) येथील स्त्री व कुटीर रुग्णालयात आयोजित नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे शुक्रवारी ( दि ०१) आयोजन केले. नेकनूरच्या रुग्णालयात रक्तदान , सर्वरोग निदान शिबिर , स्त्रियांच्या आजारावरील शिबिर अशी शिबिरे यापूर्वी आयोजित करण्यात आली होते . परंतु , नेत्र तपासणीसारखं शिबिर गेल्या सात आठ वर्षापासून पत्रकार अशोक शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त राबवून सर्वसामान्य रुग्णावर उपचार करून वाढदिवसाचा उत्सव साजरा करण्याचे कार्य आयोजित करण्यात येत असल्याने अनेकांनी वाढदिवसाच्या निमित्ताने अशा प्रकारचे आदर्श उपक्रम राबविण्याची गरज निर्माण झाली आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

### नेत्र तपासणी शिबीर हा आदर्श उपक्रम : डॉ संतोष शहाणे

**वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च न करता पत्रकार अशोक शिंदे यांनी नेत्र तपासणी व शस्त्रक्रियेसारखा आदर्श उपक्रम राबवत उपचाराच्या माध्यमातून वाढदिवसाचा उत्सव साजरा केला असल्याचे मत या वेळी कुटीर रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक संतोष शहाणे यांनी सांगून या उपक्रमाबद्दल कौतुक केले**

## घरकुलाचे थकीत हप्ते लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग व्हावे यासाठी पालकमंत्र्याला दिले निवेदन

तलवाडा । प्रतिनिधी



गेवराई तालुक्यासह तालुक्यातील तलवाडा येथील पी एम वाय व रमाई घरकुल योजनेचे उर्वरित हप्ते गेल्या आणेक महिन्या पासुन लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग होत नसल्याने घरकुल लाभार्थी मेटाकुटीला आल्याची बाब तलवाडा ग्रामपंचायतचे सिंघम उपसरपंच आक्रम सौदागर (आज्जुभाई) यांच्या निदर्शनास आल्याने याबाबत पाठपुरावा करत बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार अजितदादा पवार यांची बीड येथे भेट घेऊन घरकुलाचे थकीत हप्ते लाभार्थीच्या खात्यावर वर्ग व्हावे यासाठी निवेदन दिले असुन दिलेल्या निवेदनात म्हण्टले आहे की तलवडा ता. गेवराई जि. बीड येथील प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांच्या समस्येकडे लक्ष वेधू इच्छितो की, आज दिनांक ०१.०१.२०२६ रोजी देखील अनेक गरजु कुटूंबाची घरकुलांची कामे निधी अभावी रखडलेली आहे. तलवाडा ता. गेवराई जि. बीड येथील अनेक लाभार्थ्यांनी त्यांच्या घरकुलांची बांधकामे सुरू केली आहेत. परंतू पुढील हप्ते वेळेवर न मिळाल्याने बांधकामे अर्धवट अवस्थेत आहे. तरी मा. पालकमंत्री महोदय यांनी संबंधीत विभागाला आदेशीत करून घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर निधी जमा करून घरकुल लाभार्थ्यांना न्याय द्यावा आशी मागणी सार्वजनिकरित्या तलवाडा ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच आक्रम सौदागर(आज्जुभाई) यांनी केली आहे.

# तुकाराम बारामते यांना गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

कडा । प्रतिनिधी



भैरवनाथ विद्यालय सालेवडगाव येथील सहशिक्षक तुकाराम बारामते यांना त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील केलेल्या कार्याची दखल घेत गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रात अतिशय कमी कालावधीत उल्लेखनीय योगदान दिल्या बद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. मूळचे धामणवन ता.अकोले जि.अहिल्यानगर येथील शिक्षक तुकाराम बारामते हे अतिशय प्रतिकूल परिस्थितल्या कुटुंबातील सदस्य असून शिक्षणामुळे आपण सर्व अडचणीवर व संकटावर मात करू शकतो हे मनाशी ठरवून इंग्रजी विषयात पदवी मिळवली व बीएड केले. पहिल्याच प्रयत्नात त्यांना लोकमान्य शिक्षण संस्थेच्या भैरवनाथ विद्यालयात नोकरी मिळाली. मिळालेल्या संधीचे सोने करत त्यांनी इंग्रजी

▶▶ उर्वरित पान २ वर

# माजी विद्यार्थ्यांच्या आठवणींना उजाळा,पालक मेळावा उत्साहात संपन्न

वडवणी । प्रतिनिधी



वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथे शाळेच्या वतीने माजी विद्यार्थी आणि पालक मेळाव्याचे आयोजन शनिवारी २७ डिसेंबर रोजी करण्यात आले होते या कार्यक्रमाला चिंचाळा जिल्हा परिषदेतील प्राथमिक शाळेत जे विद्यार्थी शिकले आणि घडले असे विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने कार्यक्रमांना बोलावण्यात आले होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष बळीराम आजबे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून चिंचाळा केंद्राचे केंद्रप्रमुख देशमुख सर हे होते. यावेळी शेळेचे माजी विद्यार्थी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले विद्यार्थ्यांनी सादर स्वागत गीत सादर केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला माजी विद्यार्थी तसेच काही पालकांनीही शाळेविषयी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाला शाळेचे विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते.या कार्यक्रमाला बळीराम अजबे, श्रीराम खटावकर, सोमनाथ खताळ, देशमुख सर,

▶▶ उर्वरित पान २ वर

## अपक्ष नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, इस्माईल शेख (मंगल दादा), महेंद्र रोडे यांचा धनंजय मुंडेंच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



परळी वै. । प्रतिनिधी

परळी नगर परिषद निवडणुकीत अपक्ष म्हणून निवडून आलेले नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, इस्माईल शेख (मंगलदादा) तसेच अर्चना रोडे यांचे पती महेंद्र रोडे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असून, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## फायटर व लोखंडी गजाने मारहाण केल्याच्या आरोपातून तिन्ही आरोपीची निर्दोष मुक्तता: ॲड.ज्ञानेश्वर डी.मस्के

बीड । प्रतिनिधी



दिनांक १४ /०४ /२०२२ रोजी नाथापुर गावांमध्ये हरिनाम सप्ताह मध्ये जेवणाची पंगत चालू असताना तू बायाच्या पंगतीत फिरू नको या कारणावरून फिर्यादी व आरोपीमध्ये वाद झाला होता त्यावरून आरोपीने फिर्यादीला रात्रीच्या०९:३० नदीकाठी बोलावून शिवीगाळ करून हातातील लोखंडी गजाने डोक्यात मारून काठीने व फायटरने मारहाण करून जखमी केले. असा आरोप करत पिंपळनेर पोलीस स्टेशन गु.र.नं. ३५ / २२ कलम ३२४ ,३२३, ५०४, ५०६, ३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर मा. कोर्टात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. सदर आरोप सुरेश शिंदे, सुनील शिंदे, अभिषेक चव्हाण

▶▶ उर्वरित पान २ वर

# पालकमंत्र्यांना काळे झेंडे दाखवू नयेत म्हणून कार्यकर्त्यांना पोलिसांनी उचलले

## मात्र चिमुकल्या विद्यार्थ्यांना थंडीत झाडाखाली बसवण्याची लाज जिल्हा प्रशासनाला नाही!

बीड । प्रतिनिधी



राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आज बीड दौऱ्यावर असताना माजलगाव तालुक्यातील गेवराई मतदारसंघातील टाकरवण केंद्रीय जिल्हा परिषद शाळा अंतर्गत दत्तनगर वस्तीशाळेच्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नावरून जिल्हा प्रशासनाचा दुटप्पीपणा चव्हाट्यावर आला आहे. सुसज्ज शालेय इमारत उपलब्ध असतानाही केवळ रस्ता नसल्याच्या कारणामुळे गेल्या सव्वा दोन महिन्यांपासून ३५ पटसंख्या असलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांना कडाक्याच्या थंडीत लिंबाच्या झाडाखाली उघड्यावर बसून शिक्षण घ्यावे लागत आहे.

या गंभीर प्रश्नाबाबत सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे तसेच पालकमंत्री अजित पवार यांच्याकडेही लेखी निवेदनाद्वारे वारंवार लक्ष वेधले. मात्र प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याने अखेर पालकमंत्र्यांचा ताफा अडवून काळे झेंडे दाखवून निषेध नोंदवण्याचा इशारा देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या नावाखाली पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार आज गुरुवारी सकाळी नेकनूर पोलिस प्रशासनाच्या आदेशाने लिंबागणेश पोलिस चौकीचे पोह. गणेश परजने व पोह.मन्सुर शेख यांनी डॉ. गणेश ढवळे यांना त्यांच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# इलेक्ट्रॉनिक काट्यांची पडताळणी १२ महिन्यांचीच; २४ महिने झाल्याचा दावा चुकीचा

बीड । प्रतिनिधी

व्यापारी बंधुसाठी महत्वाचे या मथळ्याखाली सोशल मीडियावर (प्रेस नोट/व्हॉट्सप संदेश) एक संदेश प्रसारित होत असून, त्यामध्ये सर्व मोजमाप उपकरणांची पडताळणी आता एकसमान २४ महिन्यांसाठी करण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र हा दावा अंशतः चुकीचा असल्याचे स्पष्ट झाले आहे.

केंद्र शासनाच्या ग्राहक संरक्षण, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाने दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी काढलेल्या अधिसूचनेनुसार वैध मापनशास्त्र (सामान्य) नियम, २०११ मधील नियम २७(२)(क) मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

काय होती पूर्वीची तरतूद? १८ डिसेंबर २०२५ पूर्वी सर्व वजने, धारिता मापे, लांबी मोजमापे, मीटरपट्टी, टेप, बीम स्केल (दांडीचा तराजू) आणि काउंटर मशिन यांची पडताळणी २४ महिन्यांसाठी वैध होती.

काय बदल झाला आहे? १८ डिसेंबर २०२५ नंतरच्या सुधारित नियमांनुसार वरील सर्व यंत्रांसोबत इंधन डिस्पेंसर (पेट्रोल व डिझेल) यांचाही समावेश करून त्यांची पडताळणी मुदत २४ महिने करण्यात आली आहे. गैरसमज कुठे झाला? सोशल मीडियावर पसरलेल्या संदेशामुळे काही व्यापाऱ्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक काट्यांची पडताळणीही आता २४ महिन्यांसाठी झाली असल्याचा गैरसमज निर्माण झाला आहे. याबाबत वैध मापनशास्त्र विभागाने स्पष्ट केले आहे की, इलेक्ट्रॉनिक काट्यांची पडताळणी मुदत आजही १२ महिने (१ वर्ष)

▶▶ उर्वरित पान २ वर